गुरुवार दिनांक २३/०७/२०१५ रोजी सकाळी ०१.०० वाजता बांधकाम समिती सभागृह जि.प.सातारा येथे झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत

| सभेची तारीख व वेळ | उपस्थित असलेल्या सभासदाची नावे | |
|---|---|---|
| बुधवार दिनांक | १) मा.श्री.साळुंखे प्रदीप उर्फ रवि सुर्यकांत | सभापती |
| २३/०७/२०१५ रोजी | २) मा.श्री.भोसले राजू अनिल | सदस्य |
| दुपारी १.०० वाजता | ३) मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र | सदस्या |
| | ४) मा.श्री.कदम राहूल बबनराव | सदस्य |
| | ५) मा.श्री.पवार शशिकात निवृत्ती | सदस्य |
| | ६) मा.श्री.जाधव सदाशिव यशवंत | सदस्य |
| | ७) मा.सौ.घाडगे सावित्रा मानाजी | सदस्या |
| | ८) मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर | सदस्या |
| | ९) मा.श्री.जयवंत दिनकर जगताप | सदस्य |

सर्व संबधितांचे उपस्थितीमध्ये मा.सभापती बांधकाम समिती जिल्हा परिषद सातारा यांचे परवानगीने सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

विषय क्रं.१ :- दिनांक २४.०६.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्रं.१९८ :- दिनांक २४.०६.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेत आला.

सूचक :- मा.श्री.भोसले राजु अनिल
अनुमोदकः- मा.श्री.जगताप जयवंत दिनकर

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.२ :- विविध योजनांच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणे.

ठराव क्रं. १९९ :- विविध योजनेच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणेत आला. तसेच कामे मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने उप अभियंता यांना आवश्यक त्या सूचना देणेत आल्या .

सूचक :- मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर
अनुमोदक :- मा.श्री.कदम राहुल बबनराव

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.३ :- सातारा जिल्हा परिषदेच्या प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या तीन महापुरुषों अर्ध पुतळे उभारणेसाठी जागा निश्चिती बाबत विचार करणे व वास्तुविशारद यांचे नेमणुकीबाबत तसेच यासाठी येणा-या खर्चाबाबत विचार करणे.

ठराव क्रं.२०० :- सातारा जिल्हा परिषदेच्या प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या तीन महापुरुषांचे अर्धपुतळे उभारणेसाठी मा.जिल्हाधिकारी, सातारा यांचे मार्फत शासनास प्रस्ताव सादर करणेचा असलेने अर्ध पुतळयांचे चबुत-यांची मोजमापे , आराखडा, पुतळयाचे साईट प्लॅन, पुतळा ज्या धातु/साहित्यापासुन तयार करणेत येणार आहे त्या धातु/साहित्याचे प्रमाण , पुतळयांचे वजन, उंची व रंग यांचा तपशिल देणेसाठी वास्तुविशारद यांची तात्पुरती नेमणुकीस परवानगी तसेच तीन महापुरुषांचे अर्धपुतळे उभारण्यासाठी जागा निश्चित करणे तसेच यासाठी येणा-या खर्चासाठी आवश्यक निधीची तरतुद सन २०१५-१६ चे अर्थसंकल्पात रक्कम रुपये ५०,०००/- ची तरतुद करणेस ही सभा शिफारस करीत आहे.

सूचक :- मा.श्री.भोसले राजु अनिल
अनुमोदक :- मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र

ठराव सर्वानुमते मंजुर

येणेप्रमाणे विचार विनिमय झालेनंतर मा.जि.प.सदस्य,श्री.भोसले राजु अनिल यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व सभा संपलेचे जाहिर केले.

**सही /XXX**
**सचिव**
**बांधकाम समिती जि.प.सातारा**

**सही /XXX**
**सभापती**
**बांधकाम समिती जि.प.सातारा**